# संशोधकांनी उद्योजकाची भूमिका स्वीकारावी

## प्रा. गेरी जॉर्ज यांचे मत

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १२ : "जगभरातील विद्यापीठे संशोधनाबरोबर उद्योगांची केंद्रे बनत असताना आपले तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी संशोधकांनी आता उद्योजकाची भूमिका स्वीकारावी," असे आवाहन इंग्लंडमधील इंपेरिअल महाविद्यालयाच्या 'राजीव गांधी सेंटर फॉर इनोव्हेशन अँड आंत्रप्रेनरशिप'चे संचालक प्रा. गेरी जॉर्ज यांनी केले. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेमध्ये (एनसीएल) संशोधन आणि उद्योजकता व्याख्यानमालेत ते बोलत होते.

या प्रसंगी 'एनसीएल'चे संचालक डॉ. एस. शिवराम, डॉ. व्ही. प्रेमनाथ उपस्थित होते. संशोधनापासून सुरवात करून उद्योजक बनलेल्या जगभरातील यशस्वी व्यक्तींच्या कार्याचा प्रा. जॉर्ज यांनी व्याख्यानातून आढावा घेतला. ते म्हणाले, "प्रयोगशाळेतील संशोधनाचा उत्पादनापर्यंत होणाऱ्या प्रवासासाठी मोठा कालावधी लागतो. अनेकदा संशोधक आणि त्याचे तंत्रज्ञान वापरणारे उद्योजक यांमध्ये विसंवाद निर्माण होतो. आणि याचा परिणाम उत्पादनावर होतो. संशोधकानेच उद्योजकाची भूमिका स्वीकारल्यास त्याच्या तंत्राचा योग्य तो उपयोग त्याला उत्पादनामध्ये करता येऊ शकतो. यामुळे तंत्रज्ञान ते उत्पादन हा कालावधी कमी होऊन, उत्पादनाचा दर्जाही उंचावेल. मात्र यासाठी संशोधकांना एकाच वेळी तंत्रज्ञ आणि उद्योजक या दोन्ही भूमिका पार पाडाव्या लागतील."

तंत्रज्ञ आणि उद्योजक या दोन्ही भूमिका बजावून यशस्वी झालेल्या डॉ. जॉर्ज चर्च, प्रा. जो हँडल्समन, प्रा. मायकेल स्टोनब्रोकर आदींच्या कार्याचा डॉ. जॉर्ज यांनी या वेळी आढावा घेतला.